वेषांतर

( एकांकिका )

-- चं. प्र. देशपांडे



# वेषांतर

**-- चं.प्र.देशपांडे.**

सदानंद काहीतरी लिहीत बसलेला.

| | |
|---|---|
| नीता: | ( घाईघाइने रंगमंचावर येऊन मोठ्या आवाजात --) कुठूनही सुरुवात केली तरी वाटतं की याच्या आधी काही घडलंच नव्हतं ! ( कानोसा घेते, मग सदानंदकडे पाहते. त्याच्यावर काहीच परिणाम नाही. मग ते बेअरिंग सोडून ढिलेपणाने आत जाते. काही क्षणांनी सावकाश येते. उभी राहते. मग आपल्यातच गढल्या प्रमाणे म्हणते --) कुठूनही सुरुवात केली तरी वाटतं की याच्या आधी काही घडलंच नव्हतं ! ( दोन क्षण. मग पाहते. काही परिणाम नाही. निराश होऊन सावकाश परत आत जाते. काही क्षणांनी दु:खातिरेकानं आल्यासारखी येते. हुंदका आवरत नसल्याप्रमाणे बसते. आता गदगदत, भावनातिरेकानं --) कुठूनही सुरुवात केली तरी वाटतं की याच्या आधी काही घडलंच नव्हतं ! ( दु:खातिरेकानं गदगदत राहते. ) |
| सदानंद : | ( दृष्टी न उचलता -- ) हं ! |
| नीता : | ( चमकून आशेनं पाहात --) फक्त ’ हं ’ ? |
| सदानंद : | तुला नाही. |
| नीता : | मला नाही ? मग ? आणि ’ तुला नाही ’ हे तरी ? |
| सदानंद : | हं -- ते तुला. |
| नीता : | आणि आधीचं ’हं’ ? |
| सदानंद : | ते तुला नव्हतं. |
| नीता : | मग ? |
| सदानंद : | हं -- तू काय म्हणत होतीस ? |
| नीता : | ( आनंदानं --) कुठूनही सुरुवात केली तरी असं वाटतं की याच्या आधी काही घडलंच नव्हतं – असं म्हणत होते मी. |
| सदानंद : | त्या वेळी मी ’हं’ म्हणालो ते एक मुद्दा कम्प्लीट झाला म्हणून ! माझा ! मी लिहीत होतो तो ! तेव्हा मी ते ऐकलं नव्हतं ! काय म्हणालीस ? |
| नीता : | ( भरभर ) कुठूनही सुरुवात केली तरी असं वाटतं की याच्या आधी काही घडलंच नव्हतं ! |
| सदानंद : | काय, काय ? |

नीता : ( अगदी सावकाश, प्रत्येक शब्दावर जोर देत--) कुठूनही सुरुवात केली तरी असं वाटतं की – ( कंटाळते --थकून --) याच्या आधी काही घडलंच नव्हतं !( बसते.) पण जाऊ दे ते ! आता नवीनच सुरुवात करू !

सदानंद : तू अशी वैतागल्यासारखी का वागतेस ?
( नीता चकित, पण पुन्हा थकते.) अं ?

नीता : काल कोबीची भाजी खाल्लीय ना मी !

सदानंद : हं हं ! झालं ना आता ?

नीता : ( उठून-- ) काय झालं ना ? सुरुवात तरी झालीय का अजून ?

सदानंद : उरलेलं कम्प्लीट करावं म्हणत होतो !

नीता : हो, पण सुरुवातसुध्दा व्हायचीय अजून !

सदानंद : कम्प्लीट होत आलंय !

नीता : हं, ते तुझे मुद्दे ! पण मी म्हणते, त्यापेक्षा मला सुरुवात का नाही करू देत तू ?

सदानंद : मी ?

नीता : मग, दुसरं कोण, नाहीतर ?

सदानंद : हं -- मीच -- बरोबर --

नीता : तुला माझ्याकडे दुर्लक्ष करायचं असलं तर तसं सांगून टाक ! माझे कष्ट तरी वाचतील !

सदानंद : म्हणजे हे दुर्लक्ष चाललंय ! कमालाय ! ( पुन्हा बसत ) आता आपण एकदोन तासांनी बोलू पुन्हा !

नीता : का ? आत्ता चारपाच तास झालं तेवढं पुरे नाही झालं ?

सदानंद : ( आश्चर्यानं --) चारपाच तास झालं ! ?

नीता : खरं तर दहाबारा तास झाले, पण आपण आवडतो ना एकमेकांना म्हणून फक्त ते चारपाच तास वाटतंय !

सदानंद : तरी चारपाच तास म्हणजे खूप झालं ! चला ! आजचा कोटा संपला !

नीता : ( त्याच्या जवळ जात -- ) माझ्या हातनं समज मरण आलं तुला, तर कसं वाटेल ?

सदानंद : का ? का ? चांगलं रोजी चारपाच तास घालवतोय मी तुझ्याबरोबर, सगळं करतोय, तरी असं का ?

नीता : दिवसातली उरलेली काही मिनिटं मला एकटेपणा येतो म्हणून ! मला एकटेपणा सहन होत नाही हे तुला माहीत आहे !

सदानंद : हो, पण मला खतम करून तू काय अनेक होशील का ?

नीता : नंतरचा तो मुद्दा महत्त्वाचा नाही. आत्ता माझ्या एकटेपणाला तू जबाबदार आहेस !

सदानंद : एकटेपणाला दुसरा कसा काय जबाबदार असेल ?

| | | |
|---|---|---|
| नीता | : | माझ्या गंभीर प्रश्नांचे विनोद करतोयस तू ! |
| सदानंद | : | हो, पण एकटेपणाचा एकच प्रश्न म्हणालीस तू ! |
| नीता | : | याच्याइतकेच गंभीर दुसरेही आहेत ! सगळयात महत्त्वाचा एकटेपणाचा प्रश्न ! तो सुटला की बाकीच्या प्रश्नांची चर्चा करता येईल. ( सदानंद जांभई देतो. ) लगेच कंटाळा आला तुला ! |
| सदानंद | : | कंटाळा परवडला ! झोप आली झोप ! ( नीता रागानं जाऊन तो लिहीत असलेले कागद घेऊन टराटरा फाडून टाकते. ) का, असं का ? |
| नीता | : | झोप आता ! |
| सदानंद | : | ( कागदांचे चिटोरे पाहात, बसत -- पेन घेत --) आता पुन्हा सुरुवात करावी लागणार ! |
| नीता | : | आता कशी आली गाडी वळणावर ! ( घुश्श्यातच --) मग मी तेच म्हणत होते की कुठूनही सुरुवात केली तरी -- |
| सदानंद | : | माझा चष्मा -- हं -- मिळाला -- हं -- |
| नीता | : | तू तुझ्या कुठल्याही वस्तूचं नाव घेऊ नकोस -- मोडून तोडून फोडून फाडून टाकीन -- |
| सदानंद | : | आणि गाडून -- |
| नीता | : | हो, गाडूनसुध्दा ! |
| सदानंद | : | मघाचे चारपाच तास आणि हे एकदोन तास ! फार झालं ! पण असूं दे. तुझा एकटेपणा गेला की सांग ! कारण मला जरा एकटेपणा हवाय ! |
| नीता | : | तुला काय फरक पडतो ? मी इथं असले तरी एकटाच असतोस तू ! लक्ष असतं कुठे माझ्याकडे ! |
| सदानंद | : | ( उठत --) मला वाटतं आता माझी झोपायची वेळ झाली असेल ! बहुतेक ! |
| नीता | : | माझी झोपायची वेळ व्हायला खूप अवकाश आहे. एस्टॅब्लिश व्हायचंय अजून या कारणाखाली दुर्लक्ष नुसतं ! |
| सदानंद | : | ( रडवेला होत --) नीता, तू जर असं करायला लागलीस तर वकिली चालणार कशी माझी ! आत्ता कुठं जरा बऱ्या केसेस मिळायला सुरुवात झालीय ! तू आर्ग्युमेंटस् फाडून टाकणार -- झोपू देणार नाही ! लाखलाख रुपये गुंतलेले असतात याच्यात ! लोकांचे ! क्लायंट्स बोंबलतील ना माझे ! किती विचार करून लिहीत होतो मी आर्ग्युमेंट्स ! ( चिटोऱ्यांकडे पाहतो -- ) आता पुन्हा सुरुवात करावी लागेल ! |
| नीता | : | माननीय सदानंद ! त्याच्यात लाखलाख रुपये गुंतलेले असतात !ते कळतं ! मग आता मला एक सांगा, माझ्या आयुष्याचं मूल्य काय ? |
| सदानंद: | : | माझ्या आयुष्याला तरी कुठाय मूल्य ? ! ते जगायचं सोडून नाही मी केसेस चालवत बसत ! |
| नीता | : | वकिलीमुळं तुला सारखी वाद करायची सवय लागत चाललीय ! |

सदानंद : तीही सोडतो, वकिलीही सोडतो आणि तुझा एकटेपणा घालवायचं बघत बसतो ! आणि मग मी जगू कधी ?

नीता : इथंच तर खरी गोम आहे तुझी ! तू जगणार जगणार म्हणजे काय करणार ! पंतप्रधान झालास तरी तू म्हणशील, नुसती पंतप्रधानकी बसतो करत, पण मी जगू कधी ?

सदानंद : मी आता तुझे पाय धरतो ! हे एक आर्ग्युमेंट मला पूर्ण करू दे ! उद्या शेवटची तारीख आहे ! क्लायंट जोड्यानं मारेल मला !

नीता : पुढची तारीख घे मागून !

सदानंद : तसं नसतंय ते ! पुढच्या तारखा वगैरे सगळं होऊन गेलंय ते ! आता ही तारीख पाळवीच लागेल ! पाया पडतो मी तुझ्या !

नीता : मग थोडा वेळ माझ्याबरोबर घालव !

सदानंद : झाले की आता साताठ्दहा तास !

नीता : ते नुसतं वेळ घालवायचा की नाही याच्यावर झाले ! वेळ घालवाला कुठं अजून !( सदानंद हताश होतो. जाऊन पुन्हा त्याच्या खुर्चीवर बसतो. पेन घेऊन पेनकडे पाहतो, मग कागदांकडे पाहतो, मग बाजूला पुस्तकांची एक चळत ठेवलेली आहे तिच्याकडे पाहतो, मग नीताकडे पाहतो -- पराभूतपणे --)

सदानंद : तू आयुष्यातून उठवणार आहेस मला !

नीता : खरं म्हणजे आपलं हे जे झालंय ना ते लोकांचं जनरली उतारवयात होतं !

सदानंद : ( त्याच पराभूत आवाजात --) पण ज्ञान कधीही होऊ शकतं ! ज्ञानाचंसुध्दा असं रूटीन धरून कसं चालेल !( जणू स्वगत -- ) दगडाचं ज्ञान !

नीता : ( त्याची नक्कल करत --) ‘ लौकर ज्ञान झालं तर काय हरकत आहे !’-- पण तरुण वयात ज्ञान झालं तर तोल ढासळतो नं सगळा ! ( सदानंदचा जवळच्या पुस्तकांना धक्का लागतो आणि ती खाली पडतात. तो सावकाशपणे उठून एकेक पुस्तक उचलत राहतो.) तुला ज्ञान लौकर झाल्यामुळं मला एकटेपणा लौकर आला, त्याचं काय करायचं ! संसार व्हायचाय अजून सगळा !

सदानंद : हे एक एवढं आर्ग्युमेंट होऊं दे, मग मी आख्खा संसार पूर्ण करायचं तुला आश्वासन देतो !

नीता : मला नको असली वकिली आश्वासनं !

सदानंद : म्हणजे ! मी तुझा नवरा म्हणून देतोय तुला आश्वासन, वकील म्हणून नव्हे ! आणि मी म्हणतो का तुला कधी क्लेरिकल -- तू क्लार्क असून !

नीता : मला क्लेरिकल म्हणण्याएवढा काही तू मोठा वकील लागून गेलेला नाहीस !

सदानंद : हो, पण वकिली आश्वासनं म्हणण्याएवढा तरी आहे नं ! आणि एक हे आर्ग्युमेंट तू मला लिहून देत नाहीस तर कसा होणार मी मोठा वकील !

नीता : मी लिहून देऊ आर्ग्युमेंट ! वकील तू !

सदानंद : ' लिहू' देत नाहीस असं मला म्हणायचं होतं ! --'लिहून' देत नाहीस असं मी चुकून म्हणालो !

नीता : कोर्टात अशा एकेका अक्षराबद्दल सावध राहावं लागतं, नाहीतर सगळं आपल्यावर उलटतं -- हे तूच सांगतोस ना !

सदानंद : आता ती न्यायाची पध्दत आहे, त्याला मी काय करणार ?

नीता : हो, पण समजा न्यायाचं सगळं स्ट्रक्चरच चुकीचं असलं तर ते सुधारायचं काम कुणीतरी करायला नको ?

सदानंद : मी ? च्यायला, आहे त्या न्यायाच्या स्ट्रक्चरमध्ये मला काही करता येईना, आणि --

नीता : कुठल्याच क्षेत्रात आपल्याकडे काहीच होत नाही -- एखाद्या गोष्टीला असं जीवन वाहून टाकणारे लोकच नाहीत आपल्याकडे --

सदानंद : यात तुला करता येण्यासारखं काही आहे का ?

नीता : मला करायचं तेव्हा मी करणारच आहे -- सध्या चुकतंय कुठं कुठं हेच बघायची गरज वाटतीय मला ! आर्थिक व्यवस्था चुकीची आहे -- धर्माचे तर बारा वाजलेले आहेत -- साधी भाषा धड बोलता येत नाही कुणाला --

सदानंद: वाजले किती ? ( पाहून ) साडेआठ ! ( विनवत ) प्लीज !

नीता : नवीन शोध लागतायत का कुठले ! शिक्षणक्षेत्राची काय अवस्था आहे ?

सदानंद : सगळयांचं सगळं चुकतंय ! कबूल ! तो प्रश्न मिटला ! पण यात आता काहीतरी बरोबर असं करायला सुरुवात कर नं तू !

नीता : मी ? मीच का ? तू का नको ?

सदानंद : मी करत नाहीय हे चुकतंच आहे ना माझं, पण बरोबर काय हवंय हे तुलाच माहिती आहे !

नीता : माझं चुकतंय असं म्हणून पळवाटा शोधायच्या हे तुझं मी चालू देणार नाही ! का म्हणून असं पराभूत जगायचं ! धोका का नाही पत्करत ?

सदानंद : अरे, पण दुसऱ्यांनी काय करावं हे सांगण्यापेक्षा तू दे नं नोकरी सोडून ! जाऊ दे की वाऱ्यावर सगळं ! तुला कशाला पाहिजे नोकरी ?

नीता : त्याच्यावर तर चाललंय तुझं एस्टॅब्लिश होणं ! झालायस अजून एस्टॅब्लिश ?

सदानंद : तू घूस एखाद्या क्षेत्रात -- नवे विचार मांड -- घे ओढवून विरोध लोकांचा -- खून करून घे स्वत:चा – तू का नाही करत असं काही ? --

नीता : मी करायचं तेव्हा करणारच आहे पण तोपर्यंत तुम्ही पळपुटे आहात हेही मी सांगणार !

सदानंद : ते झालं ना पण कबूलच केलं की !

नीता : कबूल करणं हीही एक पळवाट आहे ! हल्ली कम्युनिकेशनच अवघड झालंय ! जरा वेगळं काही बोललं की समोरचा माणूस हल्लाच करतो ! हेसुध्दा बघायला हवंय एकदा !

सदानंद : कुणी ?

नीता : सगळयांनीच ! -- आपल्याला या प्रश्नांचं गांभीर्य वाटायला नको ?

सदानंद : मी काय म्हणतो, तुला कविता लिहिता येतात, काही मासिकं छापतातही तुझ्या कविता -- तर तूच का नाही असं काही कवितेतून करत ? कविता कुणी वाचतही नाही. त्यामुळं खून होण्याचाही धोका नाही ! निर्धोक नावीन्य !--

नीता : हल्ली प्रत्येक गोष्टीची चेष्टा करायची एक फॅशनच पडत चाललीय --

सदानंद : हेसुध्दा बघायला हवंय एकदा ! कुणीतरी ! ( ती रागावून बघतेय हे पाहून --) नाही म्हणजे सगळयांनीच ! सगळयांनीच !

नीता : तिकडं तो सॉक्रेटिस झाला, इकडं मीराबाई झाली. पण त्यानंतरच्या काळात विषाचा प्याला पिणारं कुणीच झालं नाही !

सदानंद : ( पेन उचलतो, पाहतो, ठेवतो.) या काळाला काळा कालखंड म्हणावं लागेल !

नीता : आहे की नाही पण असं -- सांग !

सदानंद : काळाचा काय संबंध याच्यात ? सॉक्रेटिसच्या काळात किती होते वीष पिणारे ? मीराबाईच्या काळात किती होते ? दारू मिळत असल्यावर कोण कशाला वीष पितंय ! तुम्ही दारूही पिणार नाही, वीषही पिणार नाही आणि नुसतीच सगळयांच्या नावानं बोटं मोडत फिरणार -- याला काय अर्थ आहे ?

नीता : हो, पण वीष प्यावं लागेल अशी वेळ आली तेव्हा वीष प्यायले ते !

सदानंद : मला विषाची परीक्षा पाह्यची नाही ! खलास ! आणि मी काळाला महत्त्व देणार नाही ! सॉक्रेटिसला देणार ! त्या काळामुळं मीराबाई झाली असं मी समजणार नाही ! खलास !

नीता : आणि आपण एका कुठल्यातरी किरकोळ आग्युमेंटचं घेऊन बसलोय !

सदानंद : आणि स्वत:च्या क्षुल्लक एकटेपणाचं !

नीता : मी तुझ्यावर भरवसा टाकून लग्न केलं तुझ्याशी !

सदानंद : मी म्हणतो, ठीक आहे, थोडं असं, थोडं तसं ! पण तुझं तूही जग नं ! जगायला सारखं प्रोत्साहन कशाला हवंय तुला ! तुझं जगणं चांगलंय, तुझं जगणं चांगलंय--असं सारखं दुसऱ्यांनी म्हणायला कशाला हवंय !

नीता : माझं मी जगणारच आहे, पण तुझं जगणं चुकतंय हेही मी सांगणार !

सदानंद : मला तू लिहूही -- हं, लिहूही -- देत नाहीस -- झोपूही देत नाहीस -- मी बोललेलं तुला काही पटतही नाही -- मग ( वैतागून ) माझंच डोकं धरून का बसतेस तू !?

नीता : मला नं नुसता वाद घालण्यात इंटरेस्ट नाही -- काहीतरी ओरिजनल असलं तर बोल !

सदानंद : ओरिजनल ! मीच का पण ? काही नाही माझ्याकडे ओरिजिनल ! -- जाव !

नीता : का नसावं ? ( तो चडफडत बसतो. ) का नसावं ?

सदानंद : हे कळण्यातच मुळात ओरिजिनॅलिटी असते नं ! तीच तर नाहीय नं ! आणि माझ्याकडे काय काय नाहीय तेच का चाललंय सारखं ! काहीच नाहीय माझ्याकडे । -- जा !

नीता : तू लगेच स्वतःची बाजू सावरायचा किंवा मांडायचा प्रयत्न करतोस ! हे चुकतं तुझं ! नुसतं ऐकूनसुध्दा घेता आलं पाहिजे ! ( तो गप्प बसतो.) गप्प का बसलास ?

सदानंद : काय करणार दुसरं ! उड्या मारू ? ( उठून दोन उड्या मारतो. ) घे ! ( पुन्हा बसतो. ) आता ( शांतपणे ) -- माझ्या मनात एक पक्षी आहे -- तो गाणं म्हणेलसं वाटतंय मला !

नीता : अरे म्हणू दे की मग ! -- हे काहीतरी महत्त्वाचं बोललायस तू !

सदानंद : वेडं व्हायच्या सीमेवर जेव्हा मी पोचलो तेव्हा बोलता आलंय मला हे !

नीता : असं वेडं होता आलं पाहिजे ! --

सदानंद : हे पण मलाच ! तू हो नं वेडी ! तुझं कशात अडकलंय मन ?

नीता : हं -- मनावरून आठवण झाली -- मानसीला मी संध्याकाळी येऊन जाईन म्हणाले होते – चटकन जाऊन येते मी -- लगेच येते -- तुला वाट पाह्यला लावणार नाही -- आले की जेवण करू -- स्वैपाक तयार आहे -- बोलू मग --

सदानंद : आणि आर्ग्युमेंटस् ?

नीता : ती घे नं लिहून तू तोपर्यंत ! ही आलेच मी !

सदानंद : इतकी जर तू चटकन येणार आहेस तर जायलाच हवंय का मग ?

नीता : म्हणजे काय ! कबूल केलंय मी ! उद्या तिच्याकडे सत्यनारायण आहे ! मदतीलाही जाणार आहे मी ! रजा घेतलीय मी त्यासाठी.

सदानंद : आज का नाही केला सत्यनारायण ? उद्या करून काय उपयोग ?

नीता : ( चपला घालत ) अरे तो त्यांचा प्रश्न आहे ! ही आलेच मी !( जाते. काही क्षण पूर्ण शांतता. सदानंद सुन्न बसलेला -- अचानक त्याच्या डोक्यात एक आयडिया येते.)

सदानंद : ( संचारल्याप्रमाणे उठत ) तिच्या मारी सालं ! असंच करावं ! वेषांतरच करायचं ! या असल्या व्यक्तिमत्वाचा काही उपयोग नाही ! व्यक्तिमत्व वेगळं पाहिजे पण आर्ग्युमेंटस् तीच लिहिता आली पाहिजेत !-- वेषांतर केलं म्हणजे जरा करडेपणा ठेवता येईल ! किंवा थोडा परकेपणा -- वेगळेपणा तरी ! वेषांतरच करावं ! -- ( आत जातो-- रंगीत बुशशर्ट घेऊन येतो -- ) हा असला शर्ट नकोच ! ( बदलतो. ) हं --पँट -- ( पुन्हा आत जातो -- येताना दाढीमिशा लावून पँट घेऊन येतो. )

दाढीमिशा झाल्या ! पँट ! ( तीही बदलतो. जुने कपडे उचलून आत टाकतो -- ) जाऊं दे झालं ! डेनाईट चष्मा ? ( इकडंतिकडं पाहून शोधून काढतो.) आता कोट आणि कॅप !( आत जाऊन चौकटीचा कोट आणि लाल रंगाची कॅप आणतो. घाईघाईनं चढवतो. मग -- ) हां ! इसको बोलते हैं वेषांतर ! ( स्वत:च्या टेबलाकडे जातो -- ) आता -- ल्याह्यला--हरकत नाही -- ( पेन उचलतो. एक चिठ्ठी लिहितो. मग नीता येते --)

नीता : ( तिचे लक्ष नाही. ) झालं ! कबूल केलं होतं ना मी ! आपला शब्द आपण पाळला पाहिजे – तिलाही बरं वाटलं. ती काळजीतच होती. म्हणाली, बरं झालं बाई, तू आलीस. जिवात जीव आला तिच्या. एवढं आरंभलंय, इतके लोक येणार --काळजी वाटतेच माणसाला -- आणि -- ( त्याच्याकडे पाहून दचकते. )

सदानंद : ( स्वत:शी ) हं -- चिठ्ठी तयार आहे -- आता आर्ग्युमेंटस् ! पाहिल्यापासून !

नीता : कोण तुम्ही ? इथं -- म्हणजे --

सदानंद : ( आवाज बदलून ) मी महेश्वर वर्टी -- सदानंदचा असिस्टंट -- म्हणजे आम्ही दोघंही एकमेकांचे असिस्टंट आहोत -- तर ही त्यानं तुम्हाला दिलेली चिठ्ठी --

नीता : ( चिठ्ठी घेते -- वाचते --) ' माझा असिस्टंट महेश्वर वर्टी हा इथे काम करत बसेल. मी जरूरीच्या कामासाठी बाहेर जाऊन येतोय -- सदानंद.' फक्त दहा-पंधरा मिनिटं मी बाहेर गेले होते, तेवढ्यात हा गेला कुठं ?

सदानंद : तुम्ही पत्नी म्हणून सदानंदला जे प्रश्न विचारावे त्यांची उत्तरं मी देणं बरं नाही.

नीता : पण तुम्हाला माहीत असलं तर सांगायला काय हरकत आहे ? नुसती माहिती तर विचारतेय !

सदानंद : खरं किती सांगायचं -- त्याचे तपशील किती सांगायचे -- ती नुसती माहिती जरी असली तरी त्याचे परिणाम काय होतील -- हे सगळं मला कळणार नाही कारण मी काही स्वत: तुमचा पती नाही --

नीता : म्हणजे सदानंद असं ठरवून वागत असेल माझ्याशी असं तुम्ही समजता ?

सदानंद : माझी स्वत:ची पत्नी जरा हेकट आहे. तिला असं वाटतं की सगळया गोष्टींचं मूळ तिला समजतं. त्यामुळं मला काळजी घ्यावी लागते.

नीता : मूळ न सांगण्याची ?

सदानंद : नाही. मुळाशी पोचण्याचा प्रयत्न करण्याची संधी तिला मिळू नये याची.

नीता : मग यासाठी तुम्ही काय करता ?

सदानंद : सदानंदला विचारा, कारण अशा गोष्टी तुम्हाला किती सांगायच्या -- किती नाही -- हे मला माहीत नाही -- कारण --

नीता : तुम्ही माझे पती नाही आहात.

सदानंद : करेक्ट ! आणि सध्या हेच महत्त्वाचं आहे. आता कृपया मला माझं काम करू द्या --

नीता : हं, ठीक आहे. पण सदानंद माझ्याशी असे डाव खेळत असेल तर बघावंच लागेल !

सदानंद : ते तुम्ही स्वत:च बघावं लागेल !

नीता : हं -- ( आत जायला लागते तेवढ्यात दारावरची बेल वाजते. ती जाऊन दार उघडते --)

गुंदेचा : ( आत येत --) □डव्होकेट सदानंद हुक्केरीकर आहेत का ?

नीता : नाहीत. आपण कोण ?

गुंदेचा : मी रमणिकलाल गुंदेचा -- मला त्यांना भेटायचंय. ( सदानंदकडे पाहून --) हे कोण आहेत ?

नीता : महेश्वर वर्टी. त्यांचे असिस्टंट.

सदानंद : करेक्ट !

नीता : त्यांच्याशी बोला तुम्ही. ( असं म्हणून ती आत जाते. पुन्हा बाहेर येते. सदानंदजवळ जाते. त्याला -- ) सदानंदला असिस्टंट असल्याचं तो मला कधीच बोलला नव्हता. असिस्टंट कधीपासून नेमलं त्यानं तुम्हाला ? कधीपासून प्रगती झाली त्याची एवढी ? एस्टॅब्लिश होऊनही गेला का काय ?

सदानंद : कमीजास्तचा प्रकार नाही. पण आम्ही दोघेही एकमेकांचे असिस्टंट आहोत. किंबहुना मित्र आहोत.

नीता : मग तर मला हे सगळं एकदा मुळापासूनच पाहावं लागेल.

सदानंद : तुम्ही काय काय पाहणार ? लक्षात राहील सगळं तुमच्या ? आणि शिवाय त्याच्यावर आधारित निर्णय घेऊ शकाल तुम्ही ?

नीता : श्रीयुत वर्टी, इतकं गुंताड्याचं आणि अवघड असं काही नसतं ते. तुम्ही स्त्री नसून पुरुष असल्यामुळं तुम्हाला असं वाटतं. पण जनरली स्त्रीनं अंदाजे मारलेला बाण हा पुरुषाला वर्मी बसतो हे तुम्हाला माहीत नाही वर्टी ! पुरुष असल्यामुळं बेसिकली तुम्ही आणि सदानंद यांत फरक नाही.

सदानंद : ठीक आहे. सदानंद भेटल्यावर अंदाजे बाण मारा तुम्ही. रास्तच आहे ते !

गुंदेचा : अहो बाई, मला अंदाजे काहीही चालणार नाहीय, □क्युरेटची गरज आहे मला ! वकीलसाहेबांकडे केस आहे माझी. उद्या आर्ग्युमेंटस् आहेत.

नीता : ठीक आहे. मी जाते. ( जणू स्वत:शीच ) पण हा असिस्टंट सदानंदनं कधी नेमला आणि तो असा अचानक गेला कुठं -- हा डाऊट राहिलाच माझ्या मनात -- ( क्षणभरानं जाते.)

गुंदेचा : ( सदानंदजवळ जात --) तुम्हाला -- म्हणजे तुम्ही सध्या काय काम करताहात ?

सदानंद : गुंदेचा, इकडे या. असे जवळ या. तुम्हाला सांगतो. मी तुमचीच आर्ग्युमेंटस् लिहितोय. माझी बायको ही एक अत्यंत तापदायक वस्तू आहे --

गुंदेचा : तुमची बायको --

सदानंद : मीच □डव्होकेट सदानंद, ती आत गेली ती माझी बायको. पण गप्प बसा. तिला माहीत नाही.

गुंदेचा : आँ ?

सदानंद : तुमची आर्ग्युमेंटस् ल्याह्यला मला तिचा अडथळा होतोय. म्हणून मी वेषांतर केलंय. माझा एक वकीलमित्र नाटकात काम करत होता. आमच्या गॅदरिंगचं ते नाटक झाल्यावर तो लगेच गावाला गेला. त्याचा ड्रेस -- म्हणजे नाटकातला -- आणि दाढीमिशा माझ्याकडं देऊन गेला. त्यांचा उपयोग केलाय मी. तुमच्या हितासाठी. कारण तुमच्याकडून □डव्हान्स फी घेतलीय मी. तर कृपया बोलू नका. मी तुमचंच काम करतोय. मी सदानंद हुक्केरीकर. □डव्होकेट.

गुंदेचा : हां ! मग ठीक ! मी तेच बघायला आलो होतो. आर्ग्युमेंटस् झाली असली तर मला पाह्यची होती. ती १९७७ ची केस मेन्शन करायला विसरू नका. पुढं अपीलबिपील झालं तर आपलं रेकॉर्ड नीट असावं. म्हणजे झालीच नाहीत का अजून आर्ग्युमेंटस् ? आणि हे फाडलेले कागदाचे कपटे कसले पडलेत?-- ( उचलून पाहतो ) रमणिकलाल दिसतंय याच्यावर. म्हणजे एकदा लिहून फाडलीत की काय ? तुम्हाला कॉन्फिडन्स दिसत नाही ?

सदानंद: : कॉन्फिडन्स आहे.

गुंदेचा : ( ओरडत ) मग फाडलेत का हो कागद तुम्ही ? ( त्याचे ओरडणे ऐकून नीता बाहेर येते. )

सदानंद : आता कसं सांगू तुम्हाला ? ( नीता आलेली पाहून ) तुम्ही जरा संयम बाळगा. दोनेक तासांनी आलात तर आर्ग्युमेंटस् तयार असतील. १९७७ च्या केसचा मी उल्लेख करणार आहे. पण मुळात सांगितली कुणी तुम्हाला ही केस ?

गुंदेचा : तुम्हीच !

सदानंद : म्हणजे सदानंदनं !

गुंदेचा : ( नीताकडे पाहून ) हो, वकीलसाहेबांनी.

सदानंद : त्यांनी मला सगळी कल्पना दिलेली आहे.

नीता : गुंदेचा, जाऊ नका हं तुम्ही -- चहा ठेवलाय.

गुंदेचा : ( तिच्या दिशेने जातो --) नाही जात -- बसतो -- ( बसतो. ) एकदा आर्ग्युमेंटस् सबमिट झाली म्हणजे सध्या तरी संपलं. बाकी सगळी व्यवस्था झालेली आहे. फक्त आर्ग्युमेंटस् देण्याचा प्रश्न आहे. आणि ती नीटच असावीत. म्हणजे पुढं अपीलबिपील झालं तरी प्रश्न नाही.

नीता : बसा तुम्ही. कामधंदा काय तुमचा ?

गुंदेचा : कापडाचं दुकान आहे आपलं ! ' त्रिवार ' नावाचं ! म्हणजे त्रिवार सत्य म्हणतात ना तसं !

नीता : एक वार, दोन वार आणि तीन वार म्हटलं की लीलावच होतो !

गुंदेचा : अरे वा ! हे नव्हतं लक्षात आलं ! मी ते दुकान लीलावातच घेतलेलं आहे !

नीता : आलेच हं ! ( आत जाते. )

गुंदेचा : ( बसूनच --) चालू द्या तमचं ! आर्ग्युमेंटस् पाहूनच जाईन. तोपर्यंत वकीलसाहेबही येतील कदाचित !

( सदानंद मान उचलतो. मग दाद देतो. ती गुंदेचा स्वीकारतो.)

सदानंद : धीर धरी रे धीरापोटी --

गुंदेचा : कविता आहे वाटतं ! आपल्याला त्यातलं काही कळत नाही. पण हे कळलं ! थांबतोय मी.

सदानंद : माझं काम चालू आहे. ( नीता चहाच्या कपबशांचा ट्रे घेऊन येते. तिघानांही एकेक वाटते.)

नीता : माझ्या हातचा चहा सदानंदला फार आवडतो. ( सदानंद थबकलेला. )

गुंदेचा : छान !

नीता : कसली कापडं विकता तुम्ही ? मी येईन एकदा. ' त्रिवार ' ! ठीकाय !

गुंदेचा : आता उदाहरणार्थ तुमच्या अंगावरचं हे ब्लाऊज ! मी हेच कापड आमच्या दुकानातून माझ्या बायकोसाठी नेलं तर तिला नाही आवडलं -- शेवटी तिनं दुसऱ्या दुकानातून आणलं कापड ! मग आता सांगा, आम्ही एवढा स्टॉक ठेवून काय उपयोग ? कसं मऊ हलकं वाटतं की नाही अंगावर ?

नीता : होय तर ! छान आहे कापड !

गुंदेचा : हे बोलताना खरं तर मी त्या कापडाला हात लावून बोललो असतो, पण सध्या अंगावर आहे ते तुमच्या --

नीता : असू दे, असू दे ! तुमचा विचार कळतोय मला.

गुंदेचा : मला फार इन्सल्टिंग वाटलं बधा. बायकोनं दुसरीकडनं कापड आणलं ते. मला तर वाटतं की कापड तिला आवडायचा प्रश्न नसेलच. मुद्दाम माझा इन्सल्ट करायचा हाच तिचा उद्देश असणार आहे.

नीता : तुमचं काय भांडण आहे का ?

गुंदेचा : बायकोच्या बाबतीत मी फार दु:खी आहे. एवढं दुकान आहे, प्रॉपर्टी आहे, पण --

नीता : ती तुमच्या बाबतीत दु:खी नाही ?

गुंदेचा : यावेळी तुम्ही स्त्री जातीचा दृष्टिकोण न ठेवता माझ्याबद्दल सहानुभूती ठेवाल अशी मला आशा होती.

नीता : मी तिकडेच येणार आहे शेवटी, पण सुरुवात तर जनरलच करावी लागेल नं !

गुंदेचा : भरून पावलो !

नीता : इतकं भरून पावण्याइतकं काय आहे त्यात ?

गुंदेचा : अहो समोर घडतं, ऐकू येतं ते थोडं असतं -- पण आपली कल्पनाशक्ती वापरून आपण ते वाढवून घ्यायचं असतं ! मस्त वाटतं !

नीता : मजेशीर आहात तुम्ही !

गुंदेचा : बस्स् ! तुम्हाला असं वाटतं ना, मग माझी कल्पनाशक्ती बरोबर होती. याच्या उलट माझ्या बायकोच्या

बाबतीत मी कल्पनाशक्तीचा असा उपयोग करत नाही.

नीता : मग कसा करता ?

गुंदेचा : तो काही माझ्या आवडीचा विषय नाही. आपण तुमच्याबद्दल बोलत होतो तेच पुढं कंटिन्यू करू.

नीता : खरंच मजेशीर आहात तुम्ही. मला एक सांगा, तुमची आर्ग्युमेंटस् लिहून व्हायला किती वेळ लागेल ? अंदाजे ?

गुंदेचा : ते लिहितायत नं -- मी कसं सांगणार ? !

नीता : त्यांना डिस्टर्ब करायला नको म्हणून तुम्हाला विचारलं ! --

गुंदेचा : तुम्हीसुध्दा मजेशीरच आहात ! त्यांच्या डोक्यात बहुतेक तयार असेल सगळं ! फक्त ते या पुस्तकातलं थोडं, त्या पुस्तकातलं थोडं असं करण्यात जरा वेळ जाईल इतकंच. पण तासा दोन तासांत व्हावं तयार --( सदानंदकडे पाहून --) पण त्यांना नकोच डिस्टर्ब करायला --

नीता : चला आपण आतल्या खोलीत बसू तोपर्यंत. आपल्या बोलण्याचेही आवाज होतातच नाहीतरी !
( सदानंद सावध होतो पण कंट्रोल करतो.)

गुंदेचा : चला ! पण आपण आतल्या खोलीत जाण्याचा त्यांच्या लिहिण्यावर परिणाम होऊ नये म्हणजे झालं ! पण चला ! ( जातात.)

सदानंद : तिच्यायला त्या गुंदेचाच्या ! ( दातओठ खातो पण पुढे लिहीत राहतो. काही क्षण -- मग त्यांच्या खळखळून हसण्याचा आवाज --) तिच्या मारी त्याच्या ! ( पण लिहिणे चालूच -- नंतर तिचं ' इश्श !' ऐकू येतं.) आता मीच फाडून टाकीन भडव्या तुझी आर्ग्युमेंटस् ! ( पण लिहिणे चालूच --ती 'चला ! ' म्हणते. तो म्हणतो, ' चला -- इतकं छान म्हणता तुम्ही, पुन्हा एकदा म्हणा ना !' ' चला ! '-- ती म्हणते.सदानंद पेन ठेवतो. मुठी आवळतो -- उभा राहतो. पुन्हा बसतो. लिहू लागतो. थांबतो.)काहीच कसा आवाज येत नाहीय ?( एकदम त्यांच्या हसण्याचा आवाज येतो.) हसतायत का ? ( क्षणभर विचार करतो -- ) डव्हान्स फी घेतलीय त्या भडव्याकडनं ! -- ( पुन्हा लिहू लागतो. प्रकाश मंद होत जातो. जराशा आवाजानं तो झटकन सावध होणे, वगैरे. काही क्षण. मग पुन्हा प्रकाश पूर्ववत होतो. काही क्षण. मग ती दोघं हसत हसत बाहेर येतात.)

गुंदेचा : आता बहुतेक होत आली असतील आर्ग्युमेंटस् -- पण मस्त गेला वेळ ! नुसतं बसून बसून बोअर झालो असतो मी ! पण या निमित्तानं ओळख मस्त झाली आपली ! माझ्या आणखी पण काही केसेस आहेत ! -- हे वकीसाहेब आवडले आपल्याला !यांच्याकडेच देणार त्या पण ! शेवटी बाकीचं सगळं वेगळंच असतं हो ! केस चालवण्याची फॉर्म्यालिटी तेवढी वकील पूर्ण करतात -- बोलत नाही तुम्ही ?

नीता : तुम्हालाच इतका आनंद झालाय -- तोच आनंदानं पाहात होते --( सदानंद सगळी सेन्सिटिव्हिटी दडपून लिहितोय --)

गुंदेचा : तुम्हाला सांगतो -- ( इथे सदानंदचे लिहून पूर्ण होते -- तो पेन मिटवतो --) तुम्ही दिसायला अगदी --

सदानंद : ( सगळे कागद उचलून आपटत --) हं, हे घ्या ! बघा !

गुंदेचा : आलोच ! तर बाई माझ्या आवडीचं हे कापड तुमच्या अंगावर इतकं खुलून दिसतंय, काही विचारू नका-- (असं म्हणत तिच्या खांद्यावर हात ठेवतो.सदानंद पाहतोय. ती फणकाऱ्यानं उठते. चेहरा संतप्त करते --)

नीता : तुम्हाला काही वागण्याची पध्दत वगैरे आहे की नाही -- परस्त्रीच्या अंगाला हात लावता ! चालते व्हा आधी --

गुंदेचा : अहो, पण मघाशी आतसुध्दा नाही का --

नीता : चालते व्हा ! उठा ! ( गुंदेचा उठतो. ) चला ! ( गुंदेचा मागे मागे तिरका दारापर्यंत जातो. ती दार उघडते --) गेट आऊट !

गुंदेचा : पण माझी आर्ग्युमेंटस् --

नीता : चला ! बाहेर ! ( तो ' अहो पण ' करत बाहेर जातो. ' पुन्हा पाऊल ठेवायचं नाही इथे ' म्हणत तीही बाहेर जाते. एक मिनिट सगळं शांत. सदानंद उठतो. लगबगीनं दाराकडं जातो. कानोसा घेत उभा राहतो. तेवढ्यात नीता आत येते. सदानंद लगेच पोझ बदलून आळोखे पिळोखे देतो --) हलकट मेला ! कसले क्लायंटस् आणतो सदानंद !-- शी !

सदानंद : आत एकदा असाच हात लावला होता का त्यानं ?

नीता : ( त्याच्याकडे बघते. मग शांतपणे --) आता तुम्हाला सांगते. हो. लावला होता. पण ते मला खटकून मी चिडेपर्यंत एक मिनिट होऊन गेलं होतं. म्हटलं आता चिडण्यात काही अर्थ नाही. आणि म्हटलं एखादे वेळेस तसा काही उद्देश नसेलही त्याचा ! उगीच कशाला एकदम असं रूप द्या ! पण आता, बघितलंत ना, तुमच्यासमोर हात लावला त्यानं !

सदानंद : म्हणून चिडलात ! अं !

नीता : ते जाऊ द्या ! त्यातही मी एक चूक करून बसलेय ! तुम्हाला म्हणून सांगते पण कुठं बोलायचं नाही. तुम्ही म्हणालात ते बरोबरच आहे. तुमच्यासमोर त्यानं हात लावला म्हणूनच चिडले मी. पण त्याला बाहेर घालवताना मी हे त्याला सांगितलं, आणि वर असं सांगितलं की मी खरं तर चिडलेली नाही, आर्ग्युमेंटस् पाह्यला वेषांतर करून या ! तर तो वेषांतर करून येणारच ! पण आता माझी चूक माझ्या लक्षात येतीय. आता तो आला की जास्तच सलगी करायचा प्रयत्न करणार आणि मला इतकं वाढवायचं नाहीय. तर मी आता असं करते -- मीही वेषांतर करते. मी होते तुमची बायको. आणि मी स्वत: बाहेर गेलेय असं दाखवू. तुमची बायको कशी आहे ?

सदानंद : ( थक्कपणे पाहतोय -- भानावर येत --) भिकारचो -- आपलं भिकार आहे भिकार !

नीता : ठीक आहे. मी तुमच्या बायकोचं रूप घेऊन येते. म्हणजे मी जी येईन ती तुमची बायकोच आहे असं तुम्ही समजायचं -- आणि मी तुमची बायको असल्यासारखंच वागायचं -- प्लीज -- नाही म्हणू नका -- सोडवाच मला या मीच तयार केलेल्या प्रॉब्लेममधून -- प्लीज --

सदानंद : हं, ठीक आहे -- या --

नीता : ( जायला लागते, पण पुन्हा वळून जवळ येत --) पण तुम्ही सुध्दा मला अगदीच बायको समजू नका हं पण -- जरा लांबून लांबूनच जवळीक दाखवा -- नाहीतर तेवढ्यात सदानंद यायचा !( जाते. सदानंद हबकलेला. तस्सा उभा. काही क्षण जातात. प्रकाश मंद होत जातो. सदानंद सावकाश चालत येऊन बसतो. काही क्षण बसून राहतो. मग उठतो. दातओठ खात मुठी आवळतो. तीच मूठ कपाळावर मारतो. पुन्हा बसतो. लगेच उभा राहतो. भराभरा एकदोन येरझाऱ्या घालतो. मग नुसता उभा राहतो. मुंडकं गदागदा हलवतो. मग बसतो. स्वस्थ. काही क्षण. मग प्रकाश पूर्ववत होत जातो. काही क्षणांनी नीता येते. फॅशनेबल झकपक पोशाखात. केसही जरा मोकळे -- ढिले. अत्यंत आकर्षक.)

नीता : कशी वाटतेय मी ? म्हणजे तुमची बायको वाटते का ?

सदानंद : माझ्या बायकोच्या तोंडात माराल तुम्ही ! तुम्ही नाही मारलंत तर मी मारीन !

नीता : का ? का ?

सदानंद : काही नाही, निव्वळ ती माझी बायको आहे म्हणून !

नीता : तुम्हाला राग आलाय का कसला ?

सदानंद : झक मारली न् तुमच्या नवऱ्याचा असिस्टंट झालो ! आपणच तयार केलेल्या सापळयात अडकून बसलो.

नीता : असं का म्हणता ?

सदानंद : असिस्टंट आहे म्हणून ! तुमचा खुद्द नवरा असतो तर --

नीता : इश्श ! सध्या माझ्या नवऱ्याच्याच रोलमध्ये आहात तुम्ही ! विसरू नका.

सदानंद : पण माझी बायको अशी असेल असं तुम्हाला कसं काय वाटलं ? हे असले कपडे ?

नीता : तुमच्या स्वत:च्या पोशाखावरून ! पण फार तफावत पडलीय का ? आणि जरी पडत असली तरी गुंदेचाला थोडंच कळणार आहे ! माझ्या मावसबहिणीचे, इथं राहिलेले कपडे आहेत हे. तुम्ही फक्त मला तुमची बायको माना तात्पुरतं म्हणजे झालं । त्याला कटवण्यापुरतं.

सदानंद : मला आता दोन बायका झाल्या.

नीता : दोन नाही. एकच. समजून चालण्याचा तर फक्त प्रश्न आहे.

सदानंद : एक तरी आहे का ही सुध्दा एक शंकाच आहे.

नीता : तुम्ही असं उलटंसुलटं काय बोलताय ?

सदानंद : तुम्ही बोललेलं मला उलटं वाटतंय आणि मी बोललेलं सुलटं आणि मग माझंही उलटं वाटतंय !

नीता : अशा पध्दतीनं गोंधळ होईल तुमचा. सध्या एकच धरून चला आणि मन स्थिर ठेवा. प्लीज ! ( दारावरची बेल वाजते.) माझी अब्रू तुमच्या हातात आहे. तुम्ही श्रीकृष्ण आहात.( पाहते. जाते. दार उघडते. गुंदेचा येतो. सुटाबुटात. एकदम फ्रेश टाईप.)

गुंदेचा : ॲडव्होकेट सदानंद हुक्केरीकरना भेटायचंय.

नीता : कोण आपण ?

गुंदेचा : आपण कोण ?

नीता : मी यांची पत्नी. सौभाग्यवती अश्विनी वर्टी. हे श्रीयुत महेश्वर वर्टी. ॲडव्होकेट सदानंदांचे असिस्टंट.

गुंदेचा : मी रसिकलाल गुंदेचा. रमणिकलाल माझा भाऊ. त्याच्या केसची उद्या आर्ग्युमेंटस् आहेत. ती झाली असली तर पाहून यायला त्यानं मला सांगितलंय. म्हणून आलोय. ॲडव्होकेट आले नाहीत अजून ? आणि त्यांच्या पत्नी कुठे गेल्या ? ( नीता आणि सदानंद चकित --) नाही म्हणजे त्यानंच मला सांगितलं होतं की ते बाहेर गेलेत आणि त्यांच्या पत्नी आहेत म्हणून आणि हेच लिहीत होते ना आर्ग्युमेंटस् ?

सदानंद : झालीयत. त्या टेबलावर आहेत. वाचून पहा. १९७७ ची केस घातलीय.

गुंदेचा : ( टेबलाकडे जाऊ लागतो -- नीताकडे पाहून -- ) तुमची अंगकाठी अगदी ॲडव्होकेट साहेबांच्या पत्नीसारखीच आहे. सेम अगदी.

नीता : तुम्हाला कसं माहीत ?

गुंदेचा : रमणिकलालनं सांगितलेल्या वर्णनावरून बोललो मी -- ( लगेच टेबलाकडे जातो. ते कागद उचलतो. फक्त शेवट वाचतो --) हं, ठीक आहे. आपल्या बाजूनं केलंय ना आर्ग्युमेंट, बास ! पुढं अपीलबिपील झालं तर आपलं रेकॉर्ड नीट असावं. बाकीची व्यवस्था झालेली आहे. निकाल आपल्या बाजूनं लागेल. काही काळजी करू नका.

सदानंद: बाकीची व्यवस्था ?

गुंदेचा : ( हसून -- ) हे सगळं तुम्हीच करायचं असतं वस्तुत: !

सदानंद : काय ?

गुंदेचा : हेच -- आपलं -- देवाला अभिषेक, राहूचा जप ! ही सगळी व्यवस्था म्हणतोय मी !

सदानंद : आम्ही काय भटजी वाटलो काय तुम्हाला ?

गुंदेचा : काय फरक आहे ? एखाद्या तीर्थक्षेत्रावर एस.टी.तून प्रवासी उतरल्यावर जसे दहाबारा भटजी

धावत येतात तसेच तुम्हीही करता. फिडेव्हिट, डोमिसाईल सर्टिफिकेट वगैरे छोटी छोटी कामं मिळवण्यासाठी कसे पळत असता तुम्ही ! कोर्टाच्या आवारात ! तहसील कचेरीत ! सबरजिस्ट्रार ऑफिसात !

नीता : प्रत्येकाला आपापली भूमिका पार पाडावीच लागते !

सदानंद : कितीही गुंताडा झाला तरी !

गुंदेचा : हं, ते आहे म्हणा. ( विचारात पडतो. त्याच्यावर स्पॉट. ) डव्होकेट सदानंदाची पत्नी कुठंतरी गेलेली दिसतेय. पण विचारणं बरं नाही. हाच डव्होकेट सदानंद आहे हे मला माहीत आहे, मग ही वर्टीची बायको कशी ? मीच गुंदेचा आहे हे माहीत असलेलं सध्या इथं कुणीच नाही. की सदानंदाच्या बायकोनं वेषांतर करून वर्टीच्या बायकोचं रूप घेतलंय ? तसं असेल तर मीच गुंदेचा असल्याचं तिला माहीत आहे. म्हणजे सदानंदचं मला माहीत आहे आणि माझं तिला माहीत आहे. पण मी वेषांतर करून आलोय हे बहुतेक सदानंदला माहीत नसेल. की वर्टीला विश्वासात घेण्यासाठी तिनं ते सदानंदाला सांगितलं असेल ? तसं असेल तर तोही मला ओळखणार. पण सध्या तो तसं दाखवू शकणार नाही. हे सगळे धागे लक्षात ठेवून समोर दिसणाऱ्या किंवा मानलेल्या परिस्थितीत सफाईनं वागता आलं पाहिजे. ( त्याच्यावरचा स्पॉट जाऊन आता नीतावर स्पॉट.)

नीता : हा गुंदेचा आहे ते मला आणि वर्टीला माहीत आहे पण ते आम्हाला माहीत आहे हे त्याला माहीत नाही. मी खरी कोण आहे हे फक्त वर्टीला माहीत आहे. खरं काय ते माहीत असूनही हा गुंदेचाचा भाऊ आहे असं धरूनच वागावं लागेल. वर्टी तेवढा एक यातला खरा दिसतो. पण माझ्याशी तो, मी त्याची बायको असल्यासारखं वागणार आहे, म्हणजे अर्धं वेषांतर त्याचंही झालेलं आहेच ! ( आता तिच्यावरचा स्पॉट जाऊन सदानंदवर स्पॉट. )

सदानंद : हा गुंदेच्याच्या भावाच्या वेषातला गुंदेचा. मीच सदानंद असल्याचं त्याला माहीत आहे पण तो ते दाखवणार नाही. ही तर माझ्या दोन बायका. एक खरी, एक खोटी. सध्या खरी विसरायची आणि खोटी खरी धरून चालायचं. गुंदेचाला यातलं नेमकं खरं काय ते माहीत नाही. मी वर्टीच. आणि मी वर्टी आहे असं धरूनच वागावं लागेल. ही अश्विनी नाही हे फक्त मला माहीत आहे. पण गुंदेचाला ही शंका येणारच कारण मी सदानंद असल्याचं त्याला माहीत आहे. पण मी हे नीताला सांगू शकणार नाही. त्यामुळं त्याला अशी शंका यायचं काही कारण आहे असं तिला वाटणारच नाही. गुंदेचाला जरी संशय आला तरी ही अश्विनी असणं शक्य नाही असं तो म्हणून शकणार नाही. कारण मग त्यासाठी माझं भांडं फोडावं लागेल आणि अर्ग्युमेंटस् पूर्ण होण्यातही त्याला इंटरेस्ट होतंच. त्यामुळं मान्य केलेल्या योजनेपासून दूर जायचं त्याला काही कारण नाही आणि मुळात तो गुंदेचा आहे हे मला माहीत नाही असंच तो धरून चालणार ! हुश्श...( बसतो. स्पॉट जातो. प्रकाश पूर्ववत.)

सगळे : ( एकमेकांना ) कसला एवढा विचार करताय ? ( सगळयांनी एकाच वेळी हे वाक्य म्हटल्यामुळं गंमत वाटून हसतात. )

गुंदेचा : नाही, माझ्या डोक्यात असं चाललं होतं की जगात तसं वागणं किती कठीण असतं ! फार गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. काही कामचलाऊ अंदाज मनात ठेवायचे पण वापरायचे नाहीत असं करावं लागतं. नक्की माहीत असलेलंही दुसरंच काहीतरी आहे असंही धरून चालावं लागतं !

सदानंद : ( उपरोधिक सहजपणानं ) त्याच्यात इतकं काय अवघड आहे ? आपापल्या त्या त्या वेळच्या भूमिकेचं भान ठेवलं की झालं !

नीता : महेश्वर, तुला जर हे इतकं सोपं वाटत असेल तर तू राजकारणात का नाही पडत ?

सदानंद : सोपं ? झक मारत करावंच लागतं ते ! प्रश्न फक्त इतकाच आहे -- हे सगळं करत बसायचं तर मी माझं जगायचं कधी ?

नीता : हा प्रश्न महेश्वर, तुला यापूर्वी कधीच पडल्याचं मला आठवत नाही. की सदानंदाच्या तोंडून ऐकलायस तू हा प्रश्न ?

सदानंद : पण हा प्रश्न फक्त सदानंदलाच पडत असावा असं तुम्हाला -- आपलं तुला -- का वाटलं ? आणि नव्यानं माझा मलाच एखादा प्रश्न पडू शकत नाही ? इतका काही मी मेलेलो नाही.

गुंदेचा : कशाला असलं वाईटसाईट बोलता ? मरायचं तेव्हा मरू हो -- पण आत्ता कशाला ते ? -- मला तर सगळं आवडलं -- माझी केस, वकीलसाहेब, आर्ग्युमेंटस्, हे टेबल, ही खुर्ची -- सगळं --

सदानंद : भो ऽऽ ( राग आवरत ) तुम्ही फक्त काय सांगायचं वगळलं ते मला कळलं -- समजा तुम्ही ऐकत नसता आणि मला स्वातंत्र्य असतं, तर मी मला काय आवडलं ते सांगितलं असतं -- तुमचा पार्श्वभाग ! -- लाथ मारायला चांगला आहे !

गुंदेचा : मर्यादा सोडताय तुम्ही ! मीसुध्दा असले अपमान सहन करण्याइतका मेलेलो नाही !

नीता : बरं, जाऊ दे आता -- मला आता पुन्हा एकटेपणा यायला लागला --

सदानंद : वेषांतरातसुध्दा ?

नीता : कुणी केलंय वेषांतर ? आणि समजा केलं तर पहिलं ओरिजनल माणूस मरतं थोडंच ? मला तर काहीच बदल जाणवत नाही -- सध्या तर माझा एकटेपणा घालवायला मला कोणताच मार्ग दिसत नाही -- सदानंदच आला तर बरं होईल --

सदानंद : आता सदानंद तुमच्या एकटेपणाला पुन्हा बळी पडण्याची शक्यता नाही --

नीता : म्हणजे ?

सदानंद : म्हणजे ? गुंदेचा, इकडे या -- ( गुंदेचा येतो. आर्ग्युमेंटस् दाखवत --) ही तुमची आर्ग्युमेंटस् !

( टराटर फाडतो. गुंदेचा ’ ओ,ओ,ओ ’ करत राहतो. ) कळलं ? आता तू ! बघ ! ( दाढीमिशा काढून फेकतो. ) हा आला सदानंद ! दिसला ? ! ( गुंदेचा, नीता अचंबित... )

...पडदा पडत जातो...

--- ००० ---

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्ता -चं.प्र.देशपांडे,

३, स्नेहदीप अपा. चिंतामणीनगर,

सहकारनगर नं.२, पर्वती,

पुणे - ४११ ००९.

दूरध्वनी - २४२२ ७८४७ / ४८ आणि मो – ९३७१००५७७३.